पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१२/०५/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१२/०५/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.ॲड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.कदम – प्रशासन अधिकारी, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.०२) विद्यानगर रामनगर व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०३) गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा मानधन तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०४) सांस्कृतिक आणि कला धोरणा अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २८/०४/२०१७ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्र.२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १८/०१/२०१७, ०१/०२/२०१७, १५/०२/२०१७ व २८/०४/२०१७ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्र.६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १२/०५/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२५५/२०१७, दि.२०/०४/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अतिरिक्त आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/२३५/२०१७, दि.४/३/२०१७ अन्वये मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड १९ यांना कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज, त्यांनी, यापूर्वी केलेल्या करारनाम्या प्रमाणे, पुन्हा करारनामा करून पहिल्या वर्षाचे मंजूर दराने दरमहा र.रु.९७,०२०/- या दराने दिनांक ०९/०४/२०१६ ते दिनांक ०८/०४/२०१७ या १ वर्षे कालावधीचे कामाचे आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १२/०५/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्यानगर रामनगर, व्यायामशाळा प्रभाग क्र.१० ही व्यायामशाळा शिवसमर्थ मित्र मंडळ, विद्यानगर रामनगर येथील मंडळाला ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १२/०५/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

शिवशक्ती महिला बचतगट २००६ पासून पिंपरी चिंचवड मध्ये कार्यरत असून त्यांचे कार्य समाधानकारक आहे. तरी प्रभाग क्र.१७ मधील गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा शिवशक्ती महिला बचतगटास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ०४

दिनांक - १२/०५/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण तयार करणेत आले असून सदर धोरणास मा.महापालिका सभेने ठराव क्र.४२३ दि.१८/०१/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक व कला धोरणामध्ये अंतर्भाव असल्याप्रमाणे उदा.आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, धनगरी ढोल व नृत्य, सुगम संगीत स्पर्धा, नृत्यावर आधारीत कार्यक्रम, कवी संमेलन, मराठी राजभाषादिन, सायन्स डे व परंपरा महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा, महिला महोत्सव, विज्ञान महोत्सव, नाटय अभिनय, नाटय स्पर्धा, एकांकीका स्पर्धा, आंतर महाविद्यालयीन स्पर्धा / महोत्सव, आंतर शालेय स्पर्धा / महोत्सव सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात व यापुढे दरवर्षी अंदाजपत्रकीय तरतुदीचे मर्यादेत आयोजित करणेस व पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथे दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी होणा-या विज्ञानावर आधारीत व्याख्यानानंतर एक शास्त्रीय / सुगम संगीताचा कार्यक्रम दर महिन्याला पिंपरी चिंचवड सायन्सपार्क येथे आयोजित करणेस तसेच अहिरानी साहित्य संमेलन आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८०५/२०१७
दिनांक : १२/०५/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc